# *प्रकरण I*

# *प्रस्तावना*

# प्रकरण I

# प्रस्तावना

## 1.1 चौऱ्याहत्तरावी संविधान सुधारणा

1 जून 1993 पासून अंमलात आलेल्या संविधान (चौऱ्याहत्तरावी) सुधारणा अधिनियम, 1992 ने भाग IXए (नगरपालिका) लागू केला. या अधिनियमाने नागरी स्थानिक संस्थांना घटनात्मक दर्जा दिला. संविधान सुधारणा अधिनियमाच्या अनुच्छेद 243 डब्ल्युने स्थानिक संस्थांना स्वराज्य संस्था म्हणून कार्य करण्यास सक्षम करण्यासाठी आणि शक्ती आणि जबाबदाऱ्यांच्या हस्तांतरणासाठी तरतुदी करण्यासाठी आवश्यक असलेल्या शक्ती आणि अधिकार प्रदान करण्याकरिता कायदे अधिनियमित करण्यासाठी राज्य विधानमंडळाला प्राधिकृत केले.

संविधानाच्या बाराव्या अनुसूचीमध्ये नागरी स्थानिक संस्थाना हस्तांतरण करण्याकरीता खालील 18 विनिर्दिष्ट कार्ये समाविष्ट केली आहेत.

1. नगर नियोजनासह नागरी क्षेत्र विनियोजन
2. जमिनींच्या वापराचे आणि इमारतींच्या बांधकामाचे विनियमन;
3. आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी नियोजन;
4. रस्ते व पूल;
5. घरगुती, औद्योगिक आणि वाणिज्यिक प्रयोजनार्थ पाणीपुरवठा;
6. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छताविषयक निगराणी, आणि घनकचरा व्यवस्थापन;
7. अग्निशमन सेवा;
8. नागरी वनीकरण, पर्यावरणाचे संरक्षण आणि पारिस्थितिकीय घटकांचे प्रवर्धन;
9. अपंग व मतिमंद यांच्यासह समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधांचे संरक्षण करणे;
10. गलिच्छ वस्ती सुधारणा व तिचा दर्जा उंचावणे;
11. नागरी क्षेत्रातील दारिद्र्य कमी करणे;
12. उपवने, उद्याने, क्रीडांगणे यासारख्या नागरी सोयी व सुविधांची तरतूद करणे;
13. सांस्कृतिक, शैक्षणिक आणि कलात्मक दृष्टिकोनाचे प्रवर्धन;
14. दफन व दफनभूमी; दहन, दहनभूमी; व विद्युत दाहिनी;
15. गुरांचा कोंडवाडा; पशुंवरील अत्याचाराला प्रतिबंध करणे;

16. जीवनविषयक आकडेवारी, जन्म आणि मृत्यु नोंदणीसह;
17. सार्वजनिक सुविधा, रस्त्यावरील दिवाबत्ती, वाहनतळ, बसथांबे व सार्वजनिक सोयींसह;
18. कत्तलखाने आणि कातडी कमावण्याचे कारखाने यांचे विनियमन

## 1.2 महाराष्ट्रातील नागरीकरणाचा कल

1991 च्या जनगणनेनुसार, महाराष्ट्रातील शहरी लोकसंख्येची टक्केवारी 39 टक्के होती, जी 2011 च्या जनगणनेनुसार 45 टक्क्यांपर्यंत वाढली. पूर्ण संख्येत 2011 च्या जनगणनेनुसार राज्यातील शहरी लोकसंख्या 5.08 कोटी होती.

वाढत्या शहरीकरणामुळे, नागरी स्थानिक संस्थांना पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा, अग्निशमन सेवा, आपत्ती प्रतिबंध आणि पर्यावरणातील ताण कमी करण्यासाठी सक्रिय भूमिका पार पाडावी लागते.

## 1.3 नागरी स्थानिक संस्थांची रूपरेषा

महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्था तीन विधिविधानांद्वारे शासित आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका ही मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 द्वारे शासित केली जाते, तर बृहन्मुंबई महानगरपालिकेव्यतिरिक्त इतर महानगरपालिका या महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, 1949 द्वारे शासित केल्या जातात. नगरपरिषदा आणि नगर पंचायती या महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, 1965 द्वारे शासित केल्या जातात.

महाराष्ट्रात 396 नागरी स्थानिक संस्था होत्या ज्यामध्ये 27 महानगरपालिका, 241 नगरपरिषदा आणि 128 नगर पंचायती यांचा समावेश होता. राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या वर्गीकरणाचा आधार **तक्ता 1.1** मध्ये दर्शविला आहे.


**तक्ता 1.1: राज्यातील नागरी स्थानिक संस्थांचे वर्गीकरण**

| अ.क्र. | नागरी स्थानिक संस्थांचे वर्गीकरण | वर्गीकरणाचा आधार |
|---|---|---|
| 1 | महानगरपालिका | लोकसंख्या तीन लाखांहून अधिक तसेच, लोकसंख्या आणि दरडोई उत्पन्नावर आधारित पाच श्रेणींमध्ये उपविभाजित. |
| 2 | नगर परिषद | 25,000 आणि तीन लाख दरम्यान लोकसंख्या आणि अकृषिक क्षेत्रात रोजगाराची टक्केवारी 35 टक्क्यांपेक्षा कमी नाही. लोकसंख्येच्या आधारावर नगरपरिषदांची वर्ग अ, ब आणि क अशी आणखी विभागणी करण्यात आली आहे. |
| 3 | नगर पंचायत | 10,000 आणि 25,000 दरम्यान लोकसंख्या. याशिवाय वर्गीकरणासाठी अकृषिक क्षेत्रामधील रोजगार आणि 'अ' वर्गीय नगर परिषद व महानगरपालिका क्षेत्रापासूनचे अंतर हे अतिरिक्त निकष आहेत. |
| *स्रोत: संबंधित कायदे* | | |

## 1.4 महाराष्ट्रातील नागरी स्थानिक संस्थांच्या प्रशासनाची संघटनात्मक रचना

प्रधान सचिव यांच्या प्रमुखपदाखालील नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन हा राज्यातील सर्व नागरी स्थानिक संस्थांच्या प्रशासनासाठी नोडल विभाग आहे. महापालिका आयुक्त जे महानगरपालिकेचे प्रमुख आहेत ते कार्यात्मकरीत्या संबंधित निर्वाचित मंडळांना आणि प्रशासनिकरीत्या नगर विकास विभागाला प्रतिवेदन करतात. त्याचप्रमाणे मुख्याधिकारी जे नगर परिषदा आणि नगर पंचायतीचे प्रमुख आहेत ते कार्यात्मकरीत्या निर्वाचित मंडळांना आणि प्रशासनिकरीत्या नगर विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील आयुक्त व संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय[1] यांना प्रतिवेदन करतात. नागरी स्थानिक संस्थांची संघटनात्मक रचना दर्शविणारा आकृतीबंध **आलेख 1.1** मध्ये दर्शविला आहे.

**आलेख 1.1: नागरी स्थानिक संस्थांची संघटनात्मक संरचना**




---

[1] शासनाला स्थानिक संस्थांशी संबंधित धोरण तयार करण्यासाठी, नगरपालिकांच्या सामान्य कामकाजावर देखरेख करण्यासाठी आणि त्यांना अंदाजपत्रक आणि योजना तयार करण्यात मदत करण्यासाठी नगर विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली नगरपरिषद प्रशासन संचालनालयाची स्थापना 1965 मध्ये करण्यात आली. नगरपरिषद प्रशासन संचालनालय ही नगरपरिषदा आणि शासन यांच्यात समन्वयक म्हणूनही काम करते. नगरपरिषद प्रशासन संचालनालयाला विभागीय स्तरावर विभागीय संचालक आणि जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी मदत करतात.